# ६. नियम सर्वांसाठी

## सांगा पाहू !



(१) वाहतुकीचे नियम कोणते आहेत ?

(२) हे नियम पाळल्याने काय होईल, असे तुम्हांला वाटते ?

(३) यातील कोणता नियम तुम्हांला बदलावासा वाटतो ?

(४) वाहतुकीच्या शिस्तीसाठी आणखी कोणते नियम असावेत, असे तुम्हांला वाटते ?

वाहतूक सुरळीत चालावी म्हणून काही नियम असतात व आपण ते पाळतो. तसेच सामाजिक जीवनात प्रत्येकाने काय काम करायचे यासाठी काही नियम असतात. प्रत्येकाची जबाबदारी व कर्तव्ये काय आहेत हे कळावे, यासाठी नियम तयार करावे लागतात. नियमांच्या पालनाने आपल्या व्यवहारात शिस्त निर्माण होते. आपण अधिक कार्यक्षमतेने काम करू शकतो.

नियम सर्वांसाठी असतात. ते सर्वांना सारखेच लागू होतात. नियमांपुढे कोणीच श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसते. नियमांचे पालन न केल्यास शिक्षा होते. नियम मोडल्याबद्दल शिक्षा देताना कोणताही भेदभाव केला जात नाही. अशा प्रकारे 'समानता' हा नियमांचा आधार असतो.

### समाजासाठी असणाऱ्या नियमात होणारे बदल

आपले सामाजिक जीवन नियमांच्या आधारे चालते. हे नियम आपणच तयार करतो. ते सर्वांच्या हिताचे असतात म्हणून आपण त्यांचे पालन करतो. समाजासाठी असणाऱ्या या नियमांमध्ये योग्य ते बदल करावे लागतात. समाज नियमनासाठी केले जाणारे नियम व निसर्गाचे नियम यांत फरक आहे.

निसर्गाचे व्यवहार निसर्गाच्या नियमांनुसार चालतात. निसर्गाचे नियम आपण बदलू शकत नाही. सूर्याचे उगवणे व मावळणे किंवा ऋतुचक्रातील बदल कधीच थांबत नाही. गुरुत्वाकर्षणाचा नियम बदलत नाही. समुद्राची भरती-ओहोटी, चंद्राच्या बदलणाऱ्या कला या सर्व गोष्टी निसर्गनियमानुसार चालू असतात. निसर्गातील नियम हे अधिक स्थिर व निश्चित असतात, ते कालबाह्य होत नाहीत ; परंतु माणसांसाठी असणाऱ्या नियमात परिस्थितीनुसार बदल करावे लागतात. आपला देश ब्रिटिशांच्या राजवटीखाली होता, तेव्हाचे नियम वेगळे होते. आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर परिस्थिती बदलली आणि त्यानुसार समूहजीवनाचे नियम बदलले. उदा., स्वातंत्र्य मिळाले तेव्हा २१ वर्षांवरील नागरिकांना मतदानाचा हक्क होता. १९८८ नंतर मतदानाचा हक्क व्यक्तीस १८ वर्षे पूर्ण झाल्यावर देण्यात आला.

## करून पहा.



आपल्या पालकांना आणि आजी-आजोबांना त्यांच्या वेळेस शाळेत कोणते नियम होते ते विचारा. तुमचा, तुमच्या पालकांचा आणि आजी-आजोबांचा असे तीन स्तंभ तयार करा. तीन स्तंभांमध्ये शाळेसंदर्भातील नियमांविषयी माहिती भरून त्यांची तुलना करा. कोणते नियम बदलले आहेत व कोणते नाहीत यावर चर्चा करा.

## हे नेहमी लक्षात ठेवा.



मुलगा व मुलगी किंवा स्त्री आणि पुरुष यांचा दर्जा समान असतो. त्यांना विकासाच्या सारख्याच संधी मिळाल्या पाहिजेत.







### सांगा पाहू !

(१) मुलीच्या प्रश्नाला तुम्ही काय उत्तर द्याल?

(२) मुलगा आणि मुलगी असा भेदभाव आणखी कोणकोणत्या बाबतींत केला जातो असे तुम्हांला वाटते?

मुलगा आणि मुलगी असा भेदभाव करणे अयोग्य आहे. मुलींना अन्न कमी देणे किंवा त्यांना शाळेत न पाठवणे हे त्यांच्यावर अन्याय करणारे आहे. असा अन्याय समाजातल्या अन्य घटकांवरही होताना दिसतो.

या चित्रांमध्ये कोणता अन्याय होत आहे असे तुम्हांला वाटते?

कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ नये म्हणून नियम करावे लागतात.

### सांगा पाहू !

खाली नियमांची एक सूची दिली आहे. प्रत्येक नियमाचा काही हेतू आहे. काही नियमांचे अनेक हेतू आहेत. वर्गात यांतील प्रत्येक नियमावर चर्चा करा. 'मला असे वाटते' या नावाच्या पुस्तिकेत तुम्ही मांडलेल्या मतांची नोंद करा.

(१) सार्वजनिक ठिकाणी ध्वनिक्षेपकावर रात्री दहा वाजल्यानंतर बंदी.

(२) मुलामुलींना मोफत प्राथमिक शिक्षण.

(३) निर्माल्य व अन्य कचरा नदीत टाकण्यास बंदी.

(४) कौटुंबिक हिंसेपासून महिलांना संरक्षण.

(५) बालकामगारांच्या नेमणुकीवर बंदी.

(६) जंगलतोड व शिकारीवर बंदी.

आपल्या जीवनात आपण अनेक रूढी, परंपरांचेही पालन करत असतो. आपले आई, वडील, आजी, आजोबा, नातेवाईक यांचे पाहून आपण त्या परंपरा पाळतो. आपल्या समाजात अनेक चांगल्या रूढी आणि परंपरा आहेत. आपण सण-समारंभांचा



एकत्रित आनंद घेतो. घरी आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करून त्यांचा सन्मान करतो. पर्यावरणाचे संतुलन राखणाऱ्या अनेक रीती आपण परंपरेने पाळतो. प्राण्यांविषयी प्रेम व कृतज्ञता व्यक्त करतो. अहिंसा आणि शांतता ही मूल्ये प्राचीन काळापासून आपल्या सामाजिक जीवनात आहेत.

असे असले, तरी काही रूढी व परंपरा मात्र अयोग्य आहेत. त्या आपल्या समाजाच्या फायद्याच्या नाहीत. उदाहरणार्थ, जातिभेद. यामुळे समाजात उच्च-नीच अशी दरी निर्माण झाली. विषमता वाढली. अस्पृश्यता ही एक अमानुष आणि अन्यायकारक प्रथा होती. स्वतंत्र भारताच्या संविधानाने अस्पृश्यतेची प्रथा नष्ट केली.

कित्येक वेळा कायदे करून अनिष्ट रुढींचे निर्मूलन करावे लागते. आपल्या देशात सती, बालविवाह यांसारख्या रुढींवर कायदा करून बंदी घालण्यात आली. जादूटोणा करून लोकांना फसवण्यावर बंदी घालणारा कायदा सर्वप्रथम महाराष्ट्रात करण्यात आला. लग्नात हुंडा घेण्याच्या प्रथेला कायद्याने बंदी घातली आहे.

चुकीच्या रूढी-परंपरांमुळे समाजातल्या काही लोकांच्या वाट्याला उपेक्षा येते. त्यांना शिक्षण घेता येत नाही. प्रगतीच्या संधी मिळत नाहीत. रोजगार मिळत नाही, त्यामुळे गरिबी वाट्याला येते. गरिबी आणि शिक्षणाचा अभाव या आपल्या सामाजिक जीवनातील मोठ्या अडचणी आहेत. त्या दूर केल्या पाहिजेत, तरच आपण सर्वजण एकत्रितपणे पुढे जाऊ शकतो.

## पर्यावरण रक्षण

समाजात समता व न्याय प्रस्थापित करण्यासाठी जसे कायदे आवश्यक असतात, तसेच पर्यावरणाच्या रक्षणासाठीही कायद्यांची गरज असते. आपण अनेक बाबतींत निसर्गावर अवलंबून असतो. आपल्या अनेक गरजांची पूर्तता निसर्गामुळे होते. आपल्यानंतर येणाऱ्या पिढ्यांनाही नैसर्गिक साधनसंपत्ती पुरली पाहिजे. त्यासाठी आपण या साधनसंपत्तीचे जतन केले पाहिजे. ती काळजीपूर्वक वापरली पाहिजे.

**आपले सामाजिक प्रश्न**

निरक्षरता



अंधश्रद्धा





बालविवाह



बालकामगार

### माहीत आहे का तुम्हांला ?



- जातिभेद, स्त्री-पुरुष विषमता आणि स्त्री-शिक्षणाचा अभाव हे आपल्या समाजातील प्रमुख अडथळे होते. ते दूर करण्याचा प्रयत्न महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहूमहाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केला. स्त्रियांच्या शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले यांना मोठाच संघर्ष करावा लागला. त्यांच्या सहकारी फातिमा शेख यांनी त्यांना मोलाची साथ दिली. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री-शिक्षणासाठी मोठे कार्य केले. या सर्व समाजसुधारकांचे कार्य आपल्या समाजात चांगले बदल घडवून आणण्यास कारणीभूत ठरले.

### आपण काय शिकलो ?



- माणसांसाठी असणाऱ्या नियमांमध्ये बदल होतात.
- पूर्वीच्या काळी नियम हे धार्मिक परंपरा व सामाजिक रूढींच्या स्वरूपात होते.
- अनिष्ट व अमानुष रूढी आणि परंपरांच्या विरोधात कायदे केले जातात.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) आपले सामाजिक जीवन ............... आधारे चालते.

(आ) स्वतंत्र भारताच्या संविधानाने ........... प्रथा नष्ट केली.

(इ) चुकीच्या रूढी-परंपरांमुळे समाजातील काही लोकांच्या वाट्याला .............. येते.

**२. पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) नियम का तयार करावे लागतात ?

(आ) आपल्या सामाजिक जीवनात कोणती मूल्ये प्राचीन काळापासून आहेत ?

(इ) आपल्या सामाजिक जीवनातील मोठ्या अडचणी कोणत्या ?

**३. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कोणत्या अनिष्ट प्रथा कायद्याने बंद केल्या ?

(आ) पर्यावरणाच्या रक्षणासाठी नियम का करावे लागतात ?

**उपक्रम**

शाळेत खालील प्रसंगी तुम्ही कोणते नियम पाळता त्यांची यादी करा.

(१) परिपाठाच्या वेळी.

(२) मध्यान्ह भोजनाच्या वेळी.

(३) क्रीडांगणावर.

(४) शाळेच्या वाचनालयात.

* * *

5TPN6A